राज्यातील ३०० खाटांची रूग्णालये सार्वजनिक -खाजगी भागीदारी (PPP) तत्वावर चालविण्याबाबत त्रिसदस्यीय समिति गठीत करणेबाबत

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१६/ सं.क्र. १९३/ प्र.क्र. ३४ / आरोग्य -३

ए विंग़ , १० वा मजला, गो.ते. रूग्णालय संकूल इमारत
लो.टि. मार्ग , मुंबई- ४०० ००१
तारीख: २४ जानेवारी, २०१८

वाचा -

1) **केंद्र शासनाच्या भारतीय आयुर्विज्ञान परिषद अधिसूचना क्र.सं.भा. आ.प/ ३४ (४१)/२०१५-मेडि./१५७९८८, दि. २९ डिसेंबर, २०१५**
2) **भारतीय आयुर्विज्ञान परिषदेचे क्र. MCI-३४ (१)(UG) (Gen)/२०१५/१६७०-१८, दि.१६ फ़ेब्रुवारी,२०१६ चे पत्र**
3) **संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांचे क्र. संवैशिवसं/ व्हीआयपी/समिती-PPP/ अहवाल/ १७५११/ ७ - अ, दि.१० ऑगस्ट ,२०१६ चे पत्र**

प्रस्तावना -

केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये वैद्यकीय महाविद्यालये स्थापना नियमावली (सुधारणा)-२०१५ प्रसिद्ध केले आहे. यात प्रामुख्याने ३०० खाटांची रूग्णालये सार्वजनिक- खाजगी भागीदारी तत्वावर (PPP) सुरू करण्याची तरतूद समाविष्ट करण्यात आली आहे. संदर्भ क्र. २ अन्वये संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन डॉ. वेदप्रकाश मिश्रा, कुलपती, के. आय.एम.एस. डिम्ड विद्यापीठ, क-हाड यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल दि. १०.०८.२०१६ च्या पत्रान्वये सादर केला आहे. तसेच केंद्र शासनाच्या उक्त अधिसूचनेन्वये गुजरात सरकारने अदानी एज्युकेशन ॲन्ड रिसर्च फ़ाऊंडेशन या संस्थेशी केलेल्या सामंजस्य करार व त्यानुषंगाने दि. २७.०८.२००८ रोजी गुजरात सरकारने सदर संस्थेस प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. वरील सर्व बाबींचा अभ्यास करून राज्यातील ३०० खाटांची रूग्णालये व त्यातर्गत वैद्यकीय महाविद्यालये सुरू करून PPP तत्वावर चालविण्याकरीता खाजगी संस्थेस देण्याच्या अनुषंगाने त्रिसदस्यीय समिति गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय-

केंद्र शासनाच्या दि.२९.१२.२०१५ च्या अधिसूचनेतील मार्गदर्शक सूचना, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने गठीत केलेल्या मिश्रा समितीचा अहवाल तसेच गुजरात सरकारने त्यांच्या

राज्यातील संस्थेशी केलेला सामंजस्य करार व दि. २७.०८.२००८ चे प्रमाणपत्र यांचा संयुक्तपणे अभ्यास करून राज्यातील ३०० खाटांची रूग्णालये व त्यांतर्गत संलग्नित शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरू करून PPP तत्वावर चालविण्याकरीता खाजगी संस्थेस देण्याबाबत शासनाचे धोरण निश्चिती करण्याकरीता खालीलप्रमाणे त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	समिती सदस्य	पदनाम
१.	आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई	अध्यक्ष
२.	संचालक, आरोग्य सेवा, मुंबई	सदस्य सचिव
३.	संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई	सदस्य

सदर समिती राज्यातील जिल्हा रूग्णालये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित करून ते PPP तत्वावर राबविण्याच्या दृष्टीने अनुषंगिक बाबींचा अभ्यास करून याबाबत शासनाचे धोरण निश्चिती करून त्याचा अहवाल शासन निर्णयाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत शासनाला सादर करेल. त्यानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२३१३१६१७५६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.01.24 12:41:00 +05'30'

रो.दि. कदम-पाटील
शासनाच्या अवर सचिव

प्रत,

१. मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे स्वीय सहाय्यक
२. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई